आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ जून २०२४ - मंगळवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशातल्या वाराणसीतल्या  कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचा पुढचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणार आहेत. नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना याद्वारे २० हजार कोटी रुपयांहून अधिक लाभ होणार आहे. राज्यातल्या सुमारे ९० लाख ४८ हजार शेतकऱ्यांना या योजनेचे १ हजार ८४५ कोटी रुपये मिळणार आहेत.

याच कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वयं सहाय्यता गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटप करणार आहेत.

<><><><><>

योग आणि भरड धान्याच्या संबंधित जागरुकता निर्माण करुन लोकांचं आयुष्य सुदृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सरपंचांना केलं आहे. पंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र आणि इतर ठिकाणी योग आधारित कार्यक्रमांचं आयोजन करण्याचं आवाहन त्यांनी सरपंचांना पत्र लिहून केलं आहे.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये शेर-ए-कश्मिर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यात सहभागी होतील, अशी माहिती आयुष खात्याचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली.

<><><><><>

विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठीच्या निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. विधानसभेच्या आमदारांमधून या सदस्यांची निवड होणार आहे. या निवडणुकीची अधिसूचना २५ जून रोजी जारी होणार असून २ जुलैपर्यंत अर्ज भरता येतील. ३ जुलैला अर्जांची छाननी होईल

आणि ५ जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १२ जुलै रोजी ९ ते ४ दरम्यान मतदान होऊन त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल. मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक, अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि शेकापचे जयंत पाटील यांचा कार्यकाळ २७ जुलै रोजी पूर्ण होत असल्यानं ही निवडणूक होणार आहे.

<><><><><>

कोल्हापूर जिल्ह्यातल्या प्रास्तवित शक्तीपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी आज शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मार्गासाठी संपादित करण्यात आलेली बहुतांश जमीन बागायती असून या महामार्गामुळे परिसरातल्या पर्यावरण आणि जैवविविधतेचा ऱ्हास होईल या कारणामुळे कोल्हापूरसह १२ जिल्ह्यातले शेतकरी याला विरोध करत आहेत.

<><><><><>

ईव्हीएम यंत्रात फेरफार झाली असती तर भाजपाला आणखी जागा मिळाल्या असत्या असा आरोप करणाऱ्यांनी तो सिद्ध करून दाखवावा, असं आव्हान खासदार रवींद्र वायकर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला दिलं.

<><><><><>

ओबीसी आरक्षणाबाबत सरकारबरोबर चर्चा करण्यासाठी कोणतंही शिष्टमंडळ पाठवण्यात येणार नाही, असा निर्णय ओबीसी आरक्षण बचाव संयोजन समितीनं घेतला आहे, अशी माहिती ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिली आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीचे एक्झिट पोल जाहीर झाल्यानंतर शेअर बाजारात आलेल्या तेजीप्रकरणी इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज सेबीकडे तक्रार

केली. हे एक्झिट पोल राजकीय हेतूने प्रेरित होते, त्यांनी शेअर बाजारात हस्तक्षेप केल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी, सागरिका घोष, साकेत गोखले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला आहे.

<><><><>

राज्यात उद्यापासून अकोला, नंदुरबार आणि कोल्हापूर इथं पोलीस शिपाई भरती प्रक्रिया सुरु होणार आहे. अकोल्यात १९५, नंदुरबार जिल्ह्यात १५१ तर कोल्हापूरमध्ये २१३ पदांसाठी भरती होणार आहे.

<><><><>

नीट २०२४ परीक्षेतल्या अनियमिततेच्या तक्रारीवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. परीक्षेतल्या त्रुटींचं निवारण करून निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायालयानं विद्यार्थ्यांबाबत चिंता व्यक्त करत राष्ट्रीय चाचणी संस्था आणि केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे.

<><><><>

वाशिम जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये काल ईदच्या दिवशी एकूण चौघांचा तलावात बुडून मृत्यू झाला. मंगरूळपीर तालुक्यातल्या दस्तापूर इथं एका तरुणाचा, तर कारंजा तालुक्यातल्या तीन युवकांचा बुडून मृत्यू झाला.

<><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा तालुक्यातल्या कौली गावाजवळ काल झालेल्या डंपर आणि दुचाकीच्या अपघातात दोन युवकांचा मृत्यू झाला, तर

सहा जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर मयतांच्या संतप्त नातेवाईकांनी महामार्गावर दोन तास रस्ता रोको केलं.

//<><><><><>//

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ जून २०२४ - मंगळवार